RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ६८(५)] शुक्रवार, ऑगस्ट ७, २०२०/श्रावण १६, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १८०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ ऑगस्ट २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक व्यकर-१२२०/प्र.क्र. १६/कराधान-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री पटली आहे की, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) च्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, आता, उक्त अधिनियमाच्या कलम २७ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर नियम, १९७५ मध्ये खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर नियम, १९७५ च्या नियम ११अ मध्ये, पुढील परंतुक दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :–

" परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३अ) अन्वये नोंदणीकृत नियोक्ता ज्या महिन्यामध्ये तो कर भरण्यास पात्र होईल त्या महिन्यापासून तो त्याचे पहिले विवरण दाखल करील आणि त्या वर्षाच्या शेवटापर्यंत तो मासिक विवरण दाखल करणे चालू ठेवील आणि त्यानंतर नियम ११ च्या उप-नियम (३) च्या तरतुदींनुसार तो विवरण दाखल करील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**

शासनाचे उप सचिव.

FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Raiguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400032, dated the 7th August, 2020.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PFT-1220 / C.R. 16 / Taxation-3.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975);

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* read with the proviso to sub-section *(3)* of section 27 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, namely :—

1. These rules may be called the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments (Amendment) Rules, 2020.

2. In rule 11A of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Rules, 1975, the following proviso, shall be added, namely :—

"Provided that an employer registered under sub-section (3A) of section 5 of the Act shall furnish his first return from the month in which he is liable to pay tax and shall continue to furnish monthly return till the end of that year and thereafter he shall furnish the return as per the provisions of sub-rule (3) of rule 11.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

J. V. DIPTE,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.